पुणे

यंदा मूर्तींचे विसर्जनही इको-फ्रेंडली

By pudhari | Publish Date: Aug 23 2016 1:25AM | Updated Date: Aug 23 2016 1:25AM

पुणे : प्रतिनिधी

नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (एनसीएल) व नागरी प्रशासनाने गणेशोत्सवादरम्यान गणेश मूर्तींचे शास्त्रीय पद्धतीने विसर्जन करण्याचे ठरवले आहे. यासाठी यावर्षी गणेश मूर्ती विसर्जित करण्यासाठी पाण्यामध्ये अमोनियम बायकार्बोनेट (बेकिंग सोडा) घातले जाणार असल्याचे महापालिकेने ठरवले आहे. हा सोडा बेकरीमध्ये वापरला जात असतो.

लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला 125 वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे 'एनसीएल'ने शोधून काढलेला हा इको-फ्रेंडली प्रकल्प केवळ योगायोगच म्हणावा लागेल. कारण, सध्या अत्यंत गंभीर अशा या प्रश्नाला पुणे शहराला सामोरे जावे लागत आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. शुभांगी उंबरकर त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत गेल्या वर्षभरापासून यावर उपाय शोधून काढण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहेत. अखेरीस, बेकींग सोडामध्ये मूर्तींचे विसर्जन करण्याचा सोपा उपाय त्यांनी शोधून काढला आहे.

राष्ट्रीय केमिकल फर्टिलायझर (आरसीएफ) ही सरकारची खत आणि केमिकल बनवणारी कंपनी आहे. महापालिकेने 'आरसीएफ'कडून गणेशोत्सवासाठी 10 टन अमोनियम बायकार्बोनेट विकत घेण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिकेच्या आकडेवारीनुसार, शहरामध्ये 3 लाखांहून अधिक गणेश मूर्ती असल्यामुळे 2 हजार टन अमोनियम बायकार्बोनेट महापालिकेला लागणार आहे.

महापालिकेने शहरामध्ये पाण्याचे 50 हौद बांधले असून, जवळपास एक लाखांहून अधिक मूर्ती हौदांमध्ये विसर्जित केल्या जातात. महापालिका या विसर्जित मूर्तींचे नदीमध्ये किंवा खाणीमध्ये विघटन करत असे. परंतु, आता खताच्या उपायाच्या शोधानंतर महापालिका विघटन करण्याच्या पर्यायाला पूर्णविराम देण्यास इच्छित आहे.

Post a comment

Name *

Email address *

Comments *

Security Code *

DNBHW

submit cancel

इतर बातम्या

- मनपा निवडणुकांचा बिगुल
  Aug 23 2016 2:19AM
- 'सोमेश्वर'च्या ऊस अनुदानासंदर्भात चौकशी
  Aug 23 2016 2:19AM
- एकशेसोळा पोती तूरडाळ चोरीला
  Aug 23 2016 2:19AM

लेटेस्ट न्यूज

- महाड : ट्रक-टमटमची धडक, चार जखमी
- पाकिस्तानमार्गे उड्डाणास विमान कंपन्यांचा नकार
- अपघातात पोलिस कर्मचारी ठार
- सिंधूच्या यशावरून आंध्र तेलंगणात 'स्पर्धा'
- पाक : वृतवाहिनी कार्यालयावर हल्ला, 1 ठार

see more

ई-पेपर

इतर बातम्या